पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) (Formerly Solapur University)
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in
ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०

सोविसो/ परिक्षा / देयके /२०२०/232 परिपत्रक - 3 दि. ११/२/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक/ समनवयक,
प्रस्तुत विद्यापीठ सर्व संलगिनत कला व शास्त्र महाविद्यालये,
पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ सोलापूर

विषय- उत्तरपत्रिका तपासणी बाबत (On Screen Evaluation) मानधनाबाबत

महोदय,

सर्व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, परीक्षेच्या कामाकरिता On Screen Evaluation व्दारे उत्तरपत्रिका तपासुन घेण्यात आलेले आहे. तरी अद्याप पर्यत परीक्षकांचे मानधन देण्यात आलेले नाही तर B.A. व B. Sc. च्या On Screen मुल्यमापनाचे मानधन देण्याबाबत विद्यापीठाने bmps या प्रणालीचा वापर सुरु केलेला आहे. तरी ज्या शिक्षकांनी अद्याप पर्यत bmps या प्रणालीमध्ये आपले Registration केलेले नाही त्यांनी सोबत जोडलेल्या परीपत्रकान्वये bmps या प्रणालीमध्ये नोंदणी करावी.

उक्त बाब आपल्या महाविद्यालयातील संबंधिताना सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या निदर्शानास तातडीने आणावे व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

श्रेणिक शाह
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

131

सोलापूर विद्यापीठ
वित्त व लेखा विभाग
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५.
दूरध्वनी- ०२१७- २७४४७६२ ईपीएबीएक्स -२७४४७७८ (११ लाईन्स),
विस्तृत क्र. - ११८,१२० व १०६
फॅक्स नं.-०२१७-२७४४७७०
संकेत स्थळ -
http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल : fao@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

**Solapur University**
Finance & Accounts Office
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
Tel No..- 0217- 2744762, EPABX No.- 2744778
(11 Lines) Ext. No. -118,120 & 106
Fax No. -0217-2744770
Web Site http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id : fao@sus.ac.in


Ref.No.: SUS/FAO/BMPS system Circular/ 593 Date : 17 OCT 2018

# परिपत्रक

सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, समिती सदस्य, मक्तेदार व इतर यांचे देयक जलद, अचुक व ऑनलाईन पध्दतीने अदा होणेसाठी Bill Management & Payment System (BMPS-SUS) संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यामधुन सर्व संबधितांच्या देयकाची रक्कम Online पध्दतीने आदा करण्यासाठी BMPS-SUS या प्रणालीमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. याकरीता http/bmps-sus.com संकेतस्थळावर Register here येथे Click करावे. सदर लिंकवर Click करुन वैयक्तीक, बँक व व्यवसाय / नौकरी संदर्भातील माहिती अचुक व बरोबर भरावी.

आपल्या विभाग / संकुले / महाविद्यालये अंतर्गत येणा-या सर्व संबंधीतांना http/bmps-sus.com संकेतस्थळावर नोंदणी करणेबाबत सुचित करावे.

**सदर संगणकप्रणालीमध्ये देयके सादर करण्याची कार्यपध्दती -**

१. देयके सादर करण्यापूर्वी सदर प्रणालीमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे.
२. नोंदणी फॉर्म भरताना वैयक्तीक, बँक व नौकरी / व्यवसायाची माहिती सत्य व अचूक भरणे आवश्यक आहे व त्याचबरोबर बँकेचे पासबुक / चेक इमेज upload करणे आवश्यक आहे.
३. नोंदणी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर व बँक तपशीलाची पडताळणी विद्यापीठाकडून झाल्यानंतर e-mail व मोबाईलवर SMS द्वारे Login Id प्राप्त होईल.
४. देयके सादर करताना त्यावर BMPS Login -Id नमुद करणे आवश्यक आहे. Login - Id Submit केल्यानंतर मोबाईल / e-mail वर त्याचा OTP प्राप्त होईल. OTP - enter केल्यानंतर Login प्रक्रीया पूर्ण होईल.
५. देयके सादर केल्यानंतर व त्याची नोंद संबंधीत विभागाकडून BMPS प्रणालीमध्ये झाल्यानंतर संबधितांना त्या देयकाचा संदर्भ क्रमांक (Bill Reference No.) SMS द्वारे मोबाईलवर प्राप्त होईल. व सदर प्रणालीमधूनच देयकाची तपासणी, मान्यता व अदायगी इ. सर्व प्रक्रीया पूर्ण होईल.
६. देयकाच्या संदर्भक्रमांकावरुन प्रणालीमधून देयकाची सद्यस्थिती संबधितांना वेळोवेळी पाहता येईल.
७. देयके पारित झाल्यानंतर व त्याची रक्कम संबधितांच्या खात्यात वर्ग केल्यानंतर त्याची माहिती SMS / e-mail द्वारे कळविण्यात येईल.
८. संबंधीतांना Login मधून देयकासंदर्भातील विविध माहिती रिपोर्टद्वारे पाहता येईल.

**सदर संगणक प्रणालीचे फायदे खालीलप्रमाणे,**

१. सदरचे BMPS संगणक प्रणालीमध्ये सर्व संबधितांची वैयक्तिक, बँक व इतर माहितीची साठवणुक करण्यात येत असल्यामुळे सदर माहिती वारंवार घेण्याची व टायपींग करण्याची आवश्यकता नाही.
२. सदर प्रणाली मध्ये देयके नोंदवणे, तपासणे, मंजुरी व अदायगी इ. प्रक्रिया होणार असल्यामुळे देयके, अचुक व वेळेत अदा केली जातील.
३. सदर प्रणाली मध्ये नोंदणी होणा-या सर्वांना Login Id देण्यात येणार आहेत तसेच ही प्रणाली Internet Based असल्यामुळे संबधितांच्या देयकांची सद्यस्थिती त्यांचे Login मधुन पाहता येईल.

४. सदर प्रणालीमध्ये दैनंदिन प्राप्त अनेक / बहुसंख्य देयके एकाच वेळी तपासणे, मंजुरी देणे व त्यानंतर Online पध्दतीने संबंधीतांच्या बँक खात्यात वर्ग करणे यामुळे देयके त्वरीत वेळेत पारित होतील.

५. देयकाची रक्कम बँक खात्यात वर्ग केल्यानंतर त्याची माहिती संबधितांना मोबाईलवर SMS व e-mail द्वारे प्राप्त होईल.

या परीपत्रकाद्वारे आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, BMPS-SUS संगणकप्रणाली मधून देयके सादर करण्याकरीता नोंदणी करणे आवश्यक असल्यामुळे आपल्या विभाग / संकुल / महाविद्यालयाशी सर्व संबधितांना https://bmps-sus.com या संकेतस्थळावर उपरोक्त कार्यपध्दतीप्रमाणे नोंदणी करणेबाबत सुचित करावे ही विनंती.

वित्त व लेखा अधिकारी

प्रति,

१. मा. विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग सोलापूर विद्यापीठ
२. मा.संचालक सर्व संकुले सोलापूर विद्यापीठ परिसर,
३ मा. प्राचार्य, सर्व महाविद्यालये यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

प्रत,

१. मा. कुलगुरु कार्यालय
२. मा. कुलसचिव कार्यालय
३. परिपत्रक नस्ती, वित्त व लेखा विभाग.